**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY**
(Formerly University of Pune)

**समन्वय कक्ष (माध्यम)**
**गणेशखिंड, पुणे**

**Media Co-ordination Cell**
Ganeshkhind, Pune-7

२२ सप्टेंबर २०१८

# सत्रपूर्तता कालावधी संपलेल्या विद्यार्थ्यांना २०१८-१९ च्या परीक्षेस बसण्यास परवानगी

पुणे -
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व विद्याशाखांमधील ज्या विद्यार्थ्याची सत्रपूर्तता पूर्ण झाली आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांना विशेष बाब म्हणून या शैक्षणिक वर्षामध्ये (२०१८-२०१९) परीक्षेला बसण्यास परवानगी देण्याचा निर्णय आज विद्यापीठातर्फे जाहीर करण्यात आला.

ही विद्यार्थ्यांसाठी अंतिम संधी असून, या विद्यार्थ्यांकडून यासंदर्भातील हमीपत्र घेण्याच्या अटीवर त्यांना विलंब शुल्कासहित परीक्षा अर्ज भरण्याची परवानगी देण्यात आली आहे. याचबरोबर ज्या विद्यार्थ्याच्या प्रवेशित कालावधीचा अभ्यासक्रम (सत्रपूर्तता) संपुष्टात आली आहे अशा विद्यार्थ्यांना समकक्षतेने परीक्षा अर्ज भरण्याची परवानगी देण्यात आली आहे.

हे परीक्षा अर्ज २४ सप्टेंबर २०१८ पासून प्रात्यक्षिक वा लेखी परीक्षांपैकी जी आधी सुरू होईल त्या दिनांकापर्यंत ऑनलाईन पद्धतीने भरता येतील, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अशोक चव्हाण यांनी दिली.

**अभिजित घोरपडे**
विशेष कार्याधिकारी, माध्यम समन्वय कक्ष
sppumediacell@gmail.com